दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले * अंक : २७ * जालना * * शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६ * * पाने : ४ * *किंमत : २ रूपये *

# मोकाट जनावरे रस्त्यावर सोडल्यास होणार दंडात्मक कारवाई , नगर पालिका ॲक्शन मोडवर ; पहिल्यांदा दंड

परतूर : शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि सार्वजनिक ठिकाणी मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे. मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघातांचा धोका वाढत असल्याने परतूर नगरपालिका प्रशासनाने आता या समस्येवर कठोर भूमिका घेतली आहे. रस्त्यावर जनावरे मोकाट सोडणाऱ्या पशुपालकांवर नियमानुसार दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. मागील काही दिवसांपासून शहरात मोकाट जनावरांची संख्या वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून नगरपालिका प्रशासनाकडे प्राप्त होत होत्या. विशेषतः वर्दळीच्या रस्त्यांवर तसेच चौकांमध्ये जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना अचानक ब्रेक लावावे लागत आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून पादचाऱ्यांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने संबंधित पशुपालकांवर कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. रस्त्यावर जनावरे मोकाट सोडल्याचे पहिल्यांदा आढळून आल्यास संबंधित जनावराच्या मालकाकडून नियमानुसार दंड वसूल केला जाणार आहे. यानंतरही त्याच मालकाचे जनावर पुन्हा मोकाट आढळल्यास संबंधित जनावर जप्त करून गोशाळेत पाठविण्याची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच, वारंवार सूचना देऊनही जनावरे रस्त्यावर मोकाट सोडणाऱ्या पशुपालकांविरुद्ध नियमानुसार गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या जनावरांची योग्य ती व्यवस्था करून ती सार्वजनिक रस्त्यावर मोकाट सोडू नयेत, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाने केले आहे. मोकाट जनावरांवर कारवाई करण्यासाठी पालिकेच्या संबंधित समितीतील कर्मचारी व सदस्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. कारवाई करताना समितीतील सदस्य किंवा संबंधित कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाल्यास त्यांच्यावरही नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आदेश मुख्याधिकाऱ्यांनी दिले आहेत. नगरपालिका प्रशासनाच्या या निर्णयामुळे शहरातील रस्त्यांवरील मोकाट जनावरांचा प्रश्न नियंत्रणात येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, केवळ कारवाई न करता पशुपालकांनीही जबाबदारी स्वीकारून जनावरे सुरक्षित (पान ३ वर)



**शहरातील नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता मोकाट जनावरांच्या समस्येकडे नगरपालिका प्रशासन गांभीर्याने पाहत आहे. जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या पशुपालकांना प्रथम दंड करण्यात येईल. त्यानंतरही जनावरे मोकाट आढळल्यास कारवाई करून दंड वसूल केला जाईल . वारंवार नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनीही मोकाट जनावरांबाबत पालिका प्रशासनाला माहिती देऊन सहकार्य करावे.** दीपक इंगोले, मुख्याधिकारी, परतूर नगरपालिका

**परतूर शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने यावर तातडीने उपाययोजना करण्यात येतील. जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या मालकांचा शोध घेऊन नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना पालिका प्रशासनाला देण्यात येतील. जनावरांसाठी कोंडवाड्याची व्यवस्था, तसेच मोकाट जनावरे पकडण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल. नागरिकांना त्रास होणार नाही आणि अपघातांना आळा बसेल, यासाठी पालिका प्रशासन गांभीर्याने काम करेल.**
प्रियंका राक्षे, नगराध्यक्ष, परतूर

नागरिकांच्या सुरक्षेसाठी कठोर पाऊल मोकाट जनावरांमुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे जनावरांच्या मालकांनी आपली जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत, अन्यथा दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

**मोकाट जनावरांचा प्रश्न तातडीने मार्गी लावू : आ.लोणीकर**

परतूर शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे. रस्त्यावर मोकाट जनावरे फिरत असल्याने अपघात होणे गंभीर बाब आहे. गेल्या काही महिन्यांत अपघातांच्या घटना घडल्या असून, यावर कायमस्वरूपी उपाययोजना होणे गरजेचे आहे. नगरपालिका प्रशासनाने जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या मालकांचा शोध घेऊन नियमानुसार कारवाई करावी. तसेच कोंडवाड्याची योग्य व्यवस्था करून मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. नागरिकांना आणि जनावरांना धोका निर्माण होणार नाही, यासाठी पालिका प्रशासनाशी चर्चा करून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करू.

## कारवाईसाठी समितीची नियुक्ती

मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी विशेष समिती नियुक्त केली आहे. या समितीत चंद्रकांत खनपटे, सतीश पाजगे, सुदाम खंदारे, स्वच्छता कर्मचारी महादेव साबळे आणि विशाल हिवाळे यांचा समावेश आहे.

समितीतील कर्मचारी फिल्डवर उतरणार का?

मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नगरपालिकेने विशेष समितीची नियुक्ती केली असली, तरी या समितीत समाविष्ट असलेले स्वच्छता विभागातील कर्मचारी सध्या कार्यालयीन कामकाजात व्यस्त असल्याचे चित्र आहे. त्यामुळे मोकाट जनावरांवर कारवाई करण्यासाठी हे कर्मचारी प्रत्यक्ष फिल्डवर कधी उतरणार? याकडे आता परतूर शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. समितीची नियुक्ती केल्यानंतर प्रत्यक्षात किती प्रभावी कारवाई होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिके करपण्याच्या मार्गावर; तात्काळ पंचनामे करून पीकविमा व नुकसानभरपाई द्या: जेथलिया

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन; शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रशासनाचे लक्ष वेधले

परतूर/प्रतिनिधी : परतूर विधानसभा मतदारसंघात यावर्षी अत्यल्प पाऊस तसेच मागील एक महिन्यापेक्षा अधिक काळ पडलेल्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत असून शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मा. उपविभागीय अधिकारी, परतूर यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना पीकविमा व शासकीय नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली. परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर, मंठा तसेच ग्रामीण भागात यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. सुरुवातीला पिकांची उगवण समाधानकारक झाली असली तरी त्यानंतर पावसाने मोठी दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. विशेषतः सोयाबीनची पाने वाळत असून झाडांची वाढ खुंटली आहे. शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या काळात पाण्याअभावी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. कापूस पिकाचीही अवस्था चिंताजनक असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या मार्गावर



आहेत. शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी व डिझेलसाठी मोठा खर्च केला असून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली आहे. वर्षभराच्या मेहनतीनंतर पीक हातात येण्याच्या काळातच पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत गावनिहाय व शेतनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पंचनाम्यांमध्ये पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंड, पिकांचे झालेले नुकसान आणि अपेक्षित (पान ३ वर)

# जालना : चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

जालना /प्रतिनिधी : गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंजूर झालेल्या चंदनझिरा पोलीस स्टेशनच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा २७ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात पार पडला. एमआयडीसी भागातील त्रिमूर्ती चौकामध्ये असलेल्या पोलीस स्टेशनच्या नियोजित जागेवर



आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार नारायण कुचे यांच्या शुभहस्ते हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, ज्येष्ठ उद्योगपती घनश्यामजी गोयल, माजी (पान ३ वर)

## तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वाखाली तळतोंडी ग्रामपंचायत सदस्य अतुल वरकड व त्यांचे सहकारी यांचा शिवसेनेत प्रवेश



प्रतिनिधी मंठा: तळतोंडी येथील अतुल वरकड,यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे तसेच शिवउद्योग सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतुल वरकड यांनी शिवबंधन बांधून पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाच्या विचारांवर विश्वास व्यक्त करत आगामी काळात पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्रवेशप्रसंगी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वरकड यांचे समर्थक उपस्थित होते. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या माध्यमातून तळतोंडी परिसरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, असा विश्वास तालुकाप्रमुख बोराडे यांनी व्यक्त केला. यावेळी भगवानराव गायकवाड, उपसरपंच मुकुंदराव गोटे, शाखा प्रमुख ज्ञानेश्वर वरकड, व शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्रह्माकुमारीज् अंबड तर्फे रक्तदान शिबीर संपन्न

प्रतिनिधि अंबड /निलेश मणियार ब्रह्माकुमारीज्च्या मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणि यांच्या स्मृतिदिन (२५ऑगस्ट) निमित्ताने राजयोग शिक्षण व संशोधन संस्थेच्या समाजसेवा प्रभागाच्या निर्देशानुसार विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियान २०२६ भारतभर राबविण्यात येत आहे. ब्रह्माकुमारीज् अंबड सेवाकेंद्राच्या वतीन रक्तदान व मुक्त रक्त तपासणी शिबिर जनकल्याण रक्तकेंद्र जालना यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अंबड सेवा केंद्राच्या संचालिका मीरादीदी,



जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव, डॉ. प्रगती तिकांडे, डॉ. रोहित भाला, उद्योजक दीपक भोरे, विजय जोशी यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. दादी प्रकाशमणि यांच्या स्मृतिदिना निमित्ताने २०२५ मध्ये एक लाख रक्त युनिट संकलानाचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते व ब्रह्माकुमारीज् संस्थेने अठ्यांशी हजार रक्त युनिट संकलित केले होते. या उपक्रमास प्रतिसाद मिळत असल्याने या वर्षी रक्तदान शिबिर घेण्यात आले आहे. रक्तदान जीवनदान आहे असे प्रतिपादन याप्रसंगी बी. के.मीरादीदी यांनी केले.

या शिबिरात १६ व्यक्तिनी रक्तदान केले. डॉ. प्रगती तिकांडे व डॉ. रोहित भाला यांनी रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ज्योती भोरे यांनी केले तर आभार चंद्रकला दीदी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सुर्वणा कदम, राम कंटूले, योगेश अडाणी, पंजाब कदम, कल्याण देवडे, सिध्देश्वर टापरे, राम वरकड, प्रतिमा टकले, मनीषा कदम, मोनिका शहाणे यांची उपस्थिती होती.

# खरिपाची पिके वाचवण्यासाठी तातडीने 'कृत्रिम पाऊस' पाडा: आ. अर्जुनराव खोतकर

जालना / प्रतिनिधी : जलनासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने पाठ वळवल्यामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून बळीराजावर मोठे संकट ओढवले आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, पिके वाचवण्यासाठी शासनाने तातडीने 'कृत्रिम पाऊस' (उर्श्रीव ड्शशवळपस) पाडण्याचे नियोजन करावे, अशी आग्रही व तळमळीची मागणी माजी मंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका पत्राद्वारे



केली आहे. कागदोपत्री आकडेवारी आणि प्रत्यक्षातील वास्तव यात तफावत आमदार अर्जुन खोतकरांनी पत्रात नमूद केले आहे की, शासकीय आकडेवारीनुसार मराठवाड्यात २०% कमी पाऊस झाल्याचे म्हटले जात असले तरी, प्रत्यक्षात सर्वदूर आणि समान (पान ३ वर)

# पाऊस कमी पडल्यामुळे ऊस ऊस उत्पादक शेतकरी समाजाचे प्रचंड नुकसान हेक्टरी ५० हजार रुपये मदत करा : मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून त्याचा सर्वाधिक फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. कमी पावसामुळे ऊस पिकाला आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसतानाच ऊस पिकावर पायरिल्या, पिठ्या ढेकूण व ऊमणी यांसारख्या किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पादनात लक्षणीय घट होत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष



प्रकाश सोळंके पाटील यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः ८०००५, १५००१२, १००००१ आणि २६५ या ऊसाच्या जातींवर कमी पाऊस आणि वाढलेल्या किडी-रोगांचा मोठा परिणाम झाला आहे. पाण्याचा ताण, कमी पाऊस आणि रोग-किडींचा वाढता प्रादुर्भाव यामुळे या जातींच्या उसाच्या वाढीवर तसेच उत्पादनावर गंभीर परिणाम होत असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ऊस उत्पादनात घट झाल्यामुळे उत्पादन खर्च मात्र वाढत असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत शासनाने केवळ परिस्थितीचा आढावा न घेता ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी तातडीने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे. हेक्टरी ५० हजार रुपये विशेष अनुदान देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी प्रकाश सोळंके पाटील यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजीराव शिंदे, मा. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मा. साखर आयुक्त पुणे, मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग तसेच मा. जिल्हाधिकारी जालना यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहे. ऊस उत्पादक शेतकरी टिकला तरच साखर उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्था टिकणार आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, कमी पाऊस, वाढलेला उत्पादन खर्च, पायरिल्या, (पान ३ वर)

# उदयेश्वर महादेव मंदिरातील चोरीप्रकरणी तिघांना अटक; १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना पोलिसांची कारवाई; पाण्याची मोटार, पितळी ताट व देवतांची तांब्याची नावे हस्तगत**

जालना । प्रतिनिधी : जालना येथील उदयेश्वर महादेव मंदिरातील साहित्य चोरीप्रकरणाचा छडा लावत कदीम जालना पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून चोरीस गेलेल्या साहित्यापैकी सुमारे १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणात आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास जालना येथील उदयेश्वर



महादेव मंदिरातील साहित्याची चोरी झाल्याचे समोर आले होते. याप्रकरणी मंदिराचे पुजारी रवी शिवाजी पवार यांच्या तक्रारीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या चोरीचा तपास करताना पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेतला. त्यानंतर तीन संशयितांना ताब्यात घेऊन (पान ३ वर)

# संपादकीय

## परिवर्तनाच्या लाटा

राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत. नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे.

# शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा!

मुंबई : राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेला मोठी गती मिळाली असून, पवित्र पोर्टलमार्फत १३ हजार ११९ शिक्षक पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. मुलाखतीशिवाय निवड प्रक्रियेत गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली असून, निवड झालेल्या उमेदवारांचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे (ऊरवर इर्हीश) यांनी अभिनंदन केले आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (ढ-खढ-२०२५)च्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांसह आदिवासी विकास विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय विद्यानिकेतन आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक पदांसाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात आली. व्यवस्थापननिहाय जिल्हा परिषद ८,४८१, महानगरपालिका १,३०६, आदिवासी विकास विभाग १,६०१, खासगी शैक्षणिक संस्था १,४५१, नगरपालिका २२६ आणि शासकीय विद्यानिकेतन ५४ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. पदनिहाय पाहता, इयत्ता १ली ते ५वीसाठी ७,५४१, ६वी ते ८वीसाठी ४,२०७, ९वी ते १0वीसाठी १,११९ आणि ११वी ते १२वीसाठी २५२ पदांचा समावेश आहे. गुणवत्तेच्या आधारे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने ही निवड प्रक्रिया राबविण्यात आल्याचे मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

# रक्षाबंधन




**राखी बांधण्याचे ३ सर्वात शुभ मुहूर्त**
**पहिला शुभ मुहूर्त: सकाळी ५:४५ ते ९:४८**
**दुसरा शुभ मुहूर्त: दुपारी १:४० ते ४:१५**
**तिसरा शुभ मुहूर्त: सायंकाळी ६:२९ ते ८:२२**

आज रक्षाबंधनाचा दिवस हा सण साजरा करण्यासाठी बहिण-भावाकडून जय्यत तयारी देखील सुरू झाली आहे. रक्षाबंधनाचा सण हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि स्नेहाचा सण असून अवघ्या देशभरात मोठ्या उत्साहात साजरे केला जातो. या दिवशी बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते, त्याच्या सुखी, निरोगी दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. धार्मिक परंपरेनुसार राखी बांधताना शुभ मुहूर्ताला विशेष महत्त्व दिले जाते. यंदा रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधण्यासाठी ३ शुभ मुहूर्त सांगण्यात आले आहेत. या मुहूर्तावर भावाला राखी बांधल्यास विधी अधिक मंगलमय होतो, अशी धार्मिक मान्यता आहे.

राखी बांधताना पूजा कशी करावी? शुभ मुहूर्तावर सर्वप्रथम भावाला पाटावर बसवून त्याचे औक्षण करावे. त्यानंतर कपाळावर कुंकू किंवा गंध लावून अक्षता अर्पण कराव्यात. भावाची आरती करून भावाच्या उजव्या मनगटावर राखी बांधावी त्यानंतर भावाला मिठाई भरवून त्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करावी. शुभ मुहूर्ताचे महत्त्व माहितीय? हिंदू धार्मिक परंपरेत कोणतेही मंगलकार्य शुभ वेळेत करण्याला महत्त्व दिले जाते. त्याचप्रमाणे रक्षाबंधनाच्या दिवशीही शुभ मुहूर्तावर राखी बांधणे मंगलकारी मानले जाते.

रक्षाबंधनाचा सण दिवसभर... महाराष्ट्रातील पंचांगानुसार २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन आहे. पंचांगानुसार, यंदा पौर्णिमा तिथी २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:0८ वाजता सुरू होणार आहे आणि २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:४७ वाजेपर्यंत राहणार आहे. पंचांगकर्त्यांच्या माहितीनुसार, २८ ऑगस्टचा संपूर्ण दिवस रक्षाबंधनाचा असणार आहे. त्यामुळे पौर्णिमा तिथी जरी समाप्त झाली असेल, तरी तुम्ही दिवसभरात कधीही भावाला राखी बांधू शकता..

# रक्षाबंधनाला बहिण-भावांप्रमाणे;पृथ्वीला सुध्दा वृक्ष लागवडीच्या बंधनात बांधावे






रक्षाबंधन हा पवित्र सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखीपौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात. हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण मानला जातो.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात.चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती. राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी जान जाये पर वचन न जायेअशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या अतुट बंधन;म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो आणि नवीन उर्जा प्राप्त होते.यामुळे बहिण-भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण-भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील. कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे व बदलत्या हवामानामुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन,भूकंप,सुनामी,ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत सोबतच आता अलनिनोचा प्रभाव वाढत आहे याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी,समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप,वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक-एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल,अलनिनोचा प्रभाव कमी होईल अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव,राष्ट्रीय कार्यक्रम,आंतरराष्ट्रीय कार्यक्रम,वाढदिवस अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये,सामाजिक संस्था यांनी या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.

**नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.**

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# शेतकऱ्यांना मोठा दिलासा, दुसऱ्या हप्त्यात कर्जमाफीचा

कर्जाच्या ओझ्याखालील शेतकऱ्यांना मोठा आधार जिल्हा मध्यवर्ती बँकेसोबतच राष्ट्रीय आणि व्यापारी बँकांच्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळत आहे. आतापर्यंत जिल्हा बँकेच्या १ लाख २ हजार ५६३ आणि राष्ट्रीय व व्यापारी बँकांच्या १२ हजार ६५२ अशा एकूण १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर सुमारे १ हजार ११४ कोटी रुपये जमा झाले आहेत. कर्जमाफीमुळे पीक कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. आगामी खरीप आणि रब्बी हंगामासाठी लागणारा खर्च, शेतीची मशागत आणि इतर आर्थिक नियोजन करण्यासाठी या मदतीचा फायदा होणार आहे. दुसर्या हप्त्यात तालुकानिहाय लाभ दुसऱ्या हप्त्यात अकोले तालुक्यातील १ हजार ८३५ शेतकऱ्यांना १६ कोटी ५८ लाख ९६ हजार रुपये, जामखेडमधील २ हजार ४४६ शेतकऱ्यांना २ कोटी ३६ लाख १९ हजार रुपये, कर्जतमधील २ हजार ६१ शेतकऱ्यांना २० कोटी ८८ लाख ४० हजार रुपये आणि कोपरगावमधील ६२८ शेतकऱ्यांना ६ कोटी १८ लाख ७२ हजार रुपयांचा लाभ मिळाला. अहिल्यानगर तालुक्यातील १ हजार ८४१ शेतकऱ्यांना १५ कोटी ८० लाख ४३ हजार रुपये, पारनेरमधील १ हजार ४४६ शेतकऱ्यांना १० कोटी ७ लाख ९२ हजार रुपये, पाथर्डीतील २ हजार ६८ शेतकऱ्यांना १६ कोटी १३ लाख ४२ हजार रुपये आणि राहाता तालुक्यातील ७९४ शेतकऱ्यांना ६ कोटी ३४ लाख २३ हजार रुपये मिळाले.तर संगमनेर तालुक्यातील १ हजार ५३६ शेतकऱ्यांना १३ कोटी ४२ लाख ९० हजार रुपये आणि श्रीरामपूरमधील १ हजार ६५४ शेतकऱ्यांना १४ कोटी ४६ लाख ३ हजार रुपये कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. सर्वाधिक लाभार्थी छत्रपती संभाजीनगर विभागात दरम्यान, दुसऱ्या टप्प्यात सर्वाधिक लाभार्थी छत्रपती संभाजीनगर विभागात ३ लाख २ हजार २७३ असून, त्यांच्या खात्यावर २ हजार २८४ कोटी ४४ लाख ६ हजार ५९० रुपये वितरित करण्यात आले. या विभागात बीडमध्ये ४०० कोटी ३२ लाख, छत्रपती संभाजीनगरमध्ये २८७ कोटी ३२ लाख, धाराशिवमध्ये १८३ कोटी ८५ लाख, हिंगोलीमध्ये १९५ कोटी ६१ लाख, जालन्यात ३६६ कोटी २७ लाख, लातूरमध्ये १२१ कोटी ७ लाख, नांदेडमध्ये ३८१ कोटी ९४ लाख आणि परभणीत ३४८ कोटी २ लाख रुपये वितरित करण्यात आ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. कर्जमाफीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३६ हजार ४२४ कर्जदार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. त्यांच्या खात्यावर एकूण ३४८ कोटी ५१ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी कर्जमाफीचा पहिला हप्ता जाहीर करण्यात आला होता. त्यामध्ये जिल्हा बँकेच्या ६६ हजार १३९ शेतकऱ्यांना ६२७ कोटी ४७ लाख २६ हजार ५६२ रुपयांचा लाभ मिळाला होता. आता दुसरा हप्ताही वितरित झाल्याने जिल्हा बँकेच्या कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांची संख्या १ लाख २ हजार ५६३ वर पोहोचली आहे. या शेतकऱ्यांच्या खात्यावर आतापर्यंत एकूण ९७५ कोटी ९८ लाख ४८ हजार ६३१ रुपये जमा झाले आहेत ले.

# महाराष्ट्र सरकार सक्रिय

मुंबई : नेपाळमध्ये निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून समन्वयाने प्रयत्न सुरू आहेत. सातारा, महाबळेश्वर आणि पुणे परिसरातील काही नागरिक नेपाळमध्ये अडकले असून, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना सुरक्षितपणे महाराष्ट्रात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. शिंदे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने नेपाळला मदतीचा हात पुढे केला आहे. महाराष्ट्र सरकार, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि शिवसेनेची आपत्ती व्यवस्थापन टीमही या परिस्थितीत सक्रिय असून, नेपाळमधील शिवसेना कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधून मदत पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, परिवहन विभागाच्या मराठी भाषा प्रशिक्षण अभियानाचेही शिंदे यांनी कौतुक केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# महिला सक्षमीकरणाचा मानबिंदू

भारतीय सशस्त्र दलात महिलांचे वाढते योगदान हे देशाच्या बदलत्या सामाजिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. महिलांनी केवळ सैन्यात प्रवेश मिळवला नाही, तर आपल्या गुणवत्ता, नेतृत्व, शिस्त आणि कर्तृत्वाच्या बळावर सर्वोच्च जबाबदाऱ्याही यशस्वीपणे पेलण्याची क्षमता सिद्ध केली. अशाच प्रेरणादायी प्रवासाची साक्ष देणारी मेजर नव्या शेखावत यांची भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी ) म्हणून झालेली नियुक्ती ही महिला सक्षमीकरणाच्या प्रवासातील एक नव्या पर्वाचा अभिमानास्पद टप्पा ठरली आहे. जर नव्या शेखावत यांनी भारतीय लष्कराच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला. त्या भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी) म्हणून नियुक्त झालेल्या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. राष्ट्रपती भवनातील ही प्रतिष्ठेची नियुक्ती भारतीय सशस्त्र दलासाठी एक ऐतिहासिक टप्पा असून, जबाबदारी, सन्मान आणि राष्ट्रीय प्रोटोकॉलच्या महत्त्वाच्या पदांवर महिलांची वाढती भूमिका अधोरेखित करणारे गौरवास्पद उदाहरण आहे. सैन्य सेवा दला(आर्मी सर्व्हिस कॉर्प)मधील अधिकारी असलेल्या मेजर नव्या शेखावत या सध्या भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. भारतीय सैन्यातील या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी असल्या तरी यापूर्वी मे २०२५ मध्ये भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी या राष्ट्रपतींच्या पहिल्या महिला अधिकारी बनल्या होत्या. मेजर शेखावत यांचे यश केवळ वैयक्तिक कामगिरी नसून भारतीय सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या योगदानाचे आणि नेतृत्वक्षमतेचे प्रतीक आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे गुणवत्ता, व्यावसायिकता आणि नेतृत्व या गुणांच्या आधारे महिलांना सर्वोच्च जबाबदाऱ्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट होते. मेजर शेखावत यांचा भारतीय सैन्यातील प्रवास संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी) आयोजित संयुक्त संरक्षण सेवा (कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस-सीडीएस) परीक्षेद्वारे सुरु झाला. त्यांनी ही अत्यंत स्पर्धात्मक अशी परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी प्रशिक्षण अकादमी (ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी), चेन्नई येथील शॉर्ट सर्व्हिस कमिशन महिला अ-तांत्रिक (वुमन नॉन टेक्निकल) अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. अधिकारी प्रशिक्षण अकादमी चेन्नई ही भारतीय सैन्याची एक प्रतिष्ठित प्रशिक्षण संस्था आहे. येथे शारीरिक क्षमता, मानसिक खंबीरपणा, नेतृत्वगुण, शिस्त आणि अधिकारी म्हणून आवश्यक असलेले सर्व गुण विकसित केले जातात. मेजर शेखावत यांनी हे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली. त्यांना सेना सेवा दल (आर्मी सर्व्हिस कॉर्प)मध्ये नियुक्त करण्यात आले. भारतीय सैन्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची शाखा असून, लष्करासाठी आवश्यक असलेला रसद पुरवठा, वाहतूक व्यवस्था, इंधन, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक सामग्रीचे व्यवस्थापन ही तिची मुख्य जबाबदारी आहे. कोणत्याही लष्करी मोहिमेच्या यशामध्ये प्रभावी रसद व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असते आणि त्यामध्ये सैन्य सेवा दलाची भूमिका कणा म्हणून ओळखली जाते. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (सीडीएस) परीक्षेत यश मिळवणाऱ्या एका उमेदवारापासून ते भारतीय सैन्यात अधिकारी आणि त्यानंतर राष्ट्रपतींच्या सहाय्यक






अधिकारीसारख्या प्रतिष्ठित पदापर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास त्यांच्या समर्पण, कौशल्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेचे उदाहरण आहे. सेवेत तुलनेने कमी कालावधीत त्यांची या पदासाठी झालेली निवड ही त्यांच्या क्षमतेवर सैन्याने दाखवलेल्या विश्वासाची साक्ष आहे. राष्ट्रपतींची सहाय्यक अधिकारी हे पद भारतीय सशस्त्र दलांतील अत्यंत प्रतिष्ठेचे आणि मानाचे मानले जाते. सहाय्यक अधिकारी हे राष्ट्रपतींच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गाचा भाग असतात आणि अधिकृत कार्यक्रम, राष्ट्रीय समारंभ, पदक वितरण सोहळे, राजनैतिक कार्यक्रम तसेच विविध शासकीय समारंभांमध्ये राष्ट्रपतींना सहाय्य करतात. या पदासाठी शिस्त, आत्मविश्वास, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवादकौशल्य आणि लष्करी प्रोटोकॉलचे सखोल ज्ञान आवश्यक असते. सहाय्यक अधिकारी हे केवळ आपल्या दलाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतीय सशस्त्र दलाच्या सन्मानाचे आणि व्यावसायिकतेचे प्रतिनिधित्व करतात. दीर्घकाळ या पदांवर प्रामुख्याने पुरुष अधिकाऱ्यांची नियुक्ती होत होती. मात्र २०२५ मध्ये लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांच्या नियुक्तीनंतर महिलांसाठी नवे दालन खुले झाले. त्यानंतर मेजर नव्या शेखावत या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी म्हणून या प्रतिष्ठित भूमिकेत विराजमान झाल्या आणि महिलांच्या प्रगतीचा हा प्रवास आणखी मजबूत झाला. राष्ट्रपती भवनातील अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींसमवेत उभ्या असलेल्या मेजर शेखावत यांच्या छायाचित्रांनी आणि व्हिडिओंनी देशभरातील तरुणांमध्ये विशेष प्रेरणा निर्माण केली आहे. विशेषतः सैन्यात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक तरुणींसाठी त्या 'नारी शक्ती'चे प्रेरणादायी प्रतीक ठरल्यात. भारतीय सैन्यात महिलांचा प्रवास पाहिला तर १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला महिलांना शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारे प्रवेश देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या आणि संधी सातत्याने वाढत गेल्या. २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना परमनंट कमिशन देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिल्यानंतर महिलांसाठी नेतृत्व, कमांड आणि दीर्घकालीन सेवाकार्यासाठी नवे मार्ग खुले झाले. मेजर नव्या शेखावत यांची नियुक्ती हा या व्यापक बदलाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा प्रवास हेही सिद्ध करतो की केवळ लढाऊ शाखाच नव्हे, तर रसद आणि सहाय्यक शाखांतील अधिकारीही गुणवत्ता आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचू शकतात. सैन्यातील यश हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून नसून शारीरिक तंदुरुस्ती, नेतृत्व, आत्मविश्वास, शिस्त आणि चारित्र्य या सर्व गुणांच्या एकत्रित विकासावर आधारित असते. त्यांची नियुक्ती भारतीय सैन्याच्या मूलभूत मूल्यांची कर्तव्य, सन्मान आणि सेवा पुन्हा एकदा प्रचिती देते. गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारावर महिलांना उच्च जबाबदाऱ्या देऊन भारतीय सैन्याने नेतृत्व हे लिंगावर नव्हे तर गुणवत्तेवर अवलंबून असते, हा भक्कम संदेश दिला. राष्ट्रपती भवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना त्या असंख्य भारतीय युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांचा प्रवास शिस्त, चिकाटी, व्यावसायिकता आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय सैन्याची वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी मेजर नव्या शेखावत यांची कथा एक महत्त्वाचा संदेश देते – समर्पण, गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण मेहनत यांच्या बळावर इतिहास घडवता येतो. जो महिलेच्या यशाचा नाही, तर तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वगुणांचा गौरव करणारा आहे.

पान ४ वरून

## माणगावमध्ये ३०

करून तरुण पिढीला शिक्षण, रोजगार, उद्योग आणि विविध क्षेत्रांत प्रगती करण्यासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न या मेळाव्याच्या माध्यमातून केला जाणार आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या ऐतिहासिक राज्यस्तरीय महामेळाव्यास महाराष्ट्रातील बुरुड समाजातील सर्व बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक एकजुटीचे दर्शन घडवावे आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हे आवाहन अखिल बुरुड समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आबासाहेब पवार, महासचिव श्री. प्रकाश माने, खजिनदार श्री. राजेंद्र नागे, रायगड जिल्हा प्रमुख श्री. संदीप नागे, कोकण विभागीय अध्यक्ष तथा शैक्षणिक, कला, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अजय मोरे, निमंत्रण व माणगाव तालुका प्रमुख श्री. संदेश महाले, सचिव श्री. धनंजय खैरे, कार्याध्यक्ष श्री. संतोष नागे तसेच प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. माणगाव येथे होणारा हा राज्यस्तरीय बुरुड समाज महामेळावा समाजातील विविध घटकांना एका छताखाली आणत सामाजिक एकजूट, शैक्षणिक प्रगती आणि समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा देणारा सोहळा ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## स्व.बाळासाहेब ठाकरे

आजारांची प्राथमिक तपासणी आणि नेत्रविषयक सेवा गावाजवळच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी, कामगार तसेच गरजू नागरिकांसाठी ही शिबिरे उपयुक्त ठरणार आहेत. प्रत्येक ठिकाणी शिबिर केवळ एका दिवसासाठी आयोजित करण्यात आले असल्याने संबंधित गाव व परिसरातील नागरिकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहून मोफत आरोग्य व नेत्र तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकारी, परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस

राखी अर्पण करून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. रक्षाबंधनाच्या माध्यमातून प्रेम, विश्वास व बंधुभावाचा संदेश देतानाच **महिलांचा सन्मान, स्वाभिमान आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती** करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. या कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी, विविध सेलचे अध्यक्ष तसेच महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन **महिला आघाडीच्या शहर-जिल्हाध्यक्ष रिंकल तायड** यांनी केले आहे.

पान १ वरून

## मोकाट जनावरे

ठिकाणी बांधून ठेवणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नगरपालिका आणि पशुपालकांनी समन्वयाने काम करण्याची गरज आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांनी रस्त्यावर मोकाट जनावरे आढळल्यास पालिकेच्या संबंधित समितीतील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा आणि प्रशासनाला कारवाईसाठी सहकार्य करावे, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाने केले आहे.

## पावसाच्या दीर्घ

उत्पादनातील घट यांची वस्तुनिष्ठ नोंद करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित विमा कंपनी व यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले पीकविमा नुकसान संदर्भातील ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच शासनाच्या लागू निकषांनुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती/पीक नुकसानभरपाई तातडीने मंजूर करावी, नुकसानग्रस्त भागात विशेष पथके नियुक्त करावीत, शेती कर्जाबाबत उपलब्ध कर्जसवलत व कर्ज पुनर्गठन योजनांचा लाभ मिळवून द्यावा आणि पीकविमा व नुकसानभरपाईची प्रक्रिया सुलभ व जलद करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय परतूर विधानसभा मतदारसंघात मंजूर झालेल्या घरकुलांच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी संबंधित गावांमध्ये ग्रामसभा आयोजित करून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे,मंठा तालुकाध्यक्ष दिलीपराव चव्हाण,आशिष भैय्या जेथलिया,इंद्रजित घनवट,हाजी रेहमत,नगरसेवक बाबुराव हिवाळे, राजेश खंडेलवाल, शाकेर खतीब, मंगेश डहाळे,मंजुळदास सोळंके,वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, दत्ता अंभुरे, गणेश ढवळे, विष्णुपंथ तनपुरे,सुरेश जिजा सवणे,बंडु भुबर,रामकिसन रुपनर,शाकेरभाई मापेगावकर,दिपक कळदाते,दत्ता अंभुरे, अनिल आंबेकर, कम्मू पठाण, मोसीन बागवान, दिपक उबाळे, दिपक मुजमुले, सुरेश भंडारी,जनार्धन काळे, योगेश डोणे,कांतराव सोळंके, डॉ. केशरखाने, संकेत अंभुरे, अजीम पठाण, विशाल पवार, रफिक कुरेशी, सोनू धुमाळ,अमेर पठाण,सौरभ अंभुरे, राहुल अंभुरे, एकनाथ बोनगे, विठ्ठल राऊत, शोएब सिद्दीकी, सचिन बोंबले, अमोल अंभुरे, विकास खुळे, अशोक खरात, अंकुश मिठे, श्रीरंग मोगरे,दत्ता लिपने,मयूर लिपने, अंबादास डवले, उद्धव पवार,मुरतूजा कल्याणकर,अजिम कुरेशी, विठ्ठलराव बागल, जगन दवणे, परमेश्वर उबाळे,प्रवीण डुकरे, शुभम कठोरे, राजेभाऊ धुमाळ, मनोज कऱ्हाळे,विष्णु मचाले,राजू कुरेशी,तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवारी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेणार

दरम्यान, परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचा प्रश्न शासनाच्या स्तरावर तातडीने मांडण्यासाठी सोमवारी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच कृषीमंत्री मा. दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन त्यांना स्वतंत्र निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी दिली. पावसाच्या दीर्घ खंडामुळे निर्माण झालेली परिस्थिती, कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे झालेले नुकसान, तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी याबाबत शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे नितिन जेथलिया यांनी सांगितले. परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना या संकटाच्या काळात शासनाकडून तातडीची मदत मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर ठोस पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत, असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत, पीकविमा नुकसानभरपाई व आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

## जालना : चंदनझिरा पोलीस

नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, उद्योजक सतिष गोयल, डी. बी. सोनी, अर्जुन गेही यांच्यासह अनेक उद्योजक व स्थानिक नागरिक उपस्थित होते. तसेच जालना महानगरपालिकेतील सर्वपक्षीय नगरसेवक, विविध गावांतील पोलीस पाटील, सरपंच, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, पोलीस उपअधिक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) श्री. बाळासाहेब पवार, जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन व शाखांचे प्रभारी पोलीस अधिकारी, शासकीय कार्यालयांचे प्रमुख आणि पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते. भूमीपूजन कार्यक्रमादरम्यान पोलीस मुख्यालयाच्या पोलीस बँड पथकाने शिस्तबद्ध वाद्य वाजवून सर्व प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचा समारोप करताना पोलीस निरीक्षक (चंदनझिरा) श्री. किरण बिडवे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

**खरिपाची पिके** पाऊस झालेला नसल्याने ही आकडेवारी कागदोपत्री ठरत आहे. गतवर्षीच्या तुलनेत निम्मीही पावसाची नोंद झालेली नाही. जालना जिल्ह्यात २३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असली तरी प्रत्यक्षात पाऊस अत्यंत नगण्य झाला आहे. पर्जन्यमापक यंत्रांमधील तांत्रिक बिघाडामुळे चुकीच्या नोंदी होत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. पिके संकटात, ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष गत ३० जुलैनंतर जालना जिल्ह्यात एकही मोठा पाऊस झालेला नाही. फवारणी केल्यासारखा किरकोळ पाऊस पडत असल्याने खरिपातील पिके माना टाकू लागली आहेत. सोयाबीनसारखे महत्त्वाचे पीक ऐन फुलोऱ्यात असताना पाऊस नसल्याने मोठा फटका बसला आहे. कापूस, मका, तूर, उडीद आणि मूग ही पिके पूर्णपणे संकटात सापडली असून अतिअल्प पावसामुळे पिके हातातून जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. बाजारपेठेवरही याचा प्रतिकूल परिणाम दिसू लागला असून अनेक गावांमध्ये अद्यापही टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. तसेच रानात हिरवा चारा उपलब्ध नसल्यामुळे गुराढोरांच्या पाण्याचा व चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

कृत्रिम पाऊस पाडण्याची सुवर्णसंधी

मराठवाड्यातील खरीप हंगामाची पिके वाचवायची असतील तर तातडीने कृत्रिम पाऊस पाडणे काळाची गरज बनली आहे. यापूर्वी २०२४ मध्ये सोलापूर, बीड आणि जालन्यात कृत्रिम पाऊस पाडण्यात आला होता. सध्या आकाशात ढग जमून येत असून पाऊस पाडण्यासाठी ढगांची मुबलकता देखील आहे. त्यामुळे शासनाने प्रथम प्राधान्याने कृत्रिम पाऊस पाडण्याचे नियोजन तातडीने करावे, अशी आग्रही विनंती आमदार खोतकरांनी केली आहे.

## उदयेश्वर महादेव मंदिरातील

चौकशी करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये सोमनाथ गजानन मुळे (वय १८), विजय अशोक गायकवाड (वय २०) आणि विशाल उर्फ रफ्या संतोष ठाकूर (वय २३) यांचा समावेश आहे. चौकशीनंतर आरोपींकडून चोरीस गेलेल्या साहित्यापैकी एचपी कंपनीची एक पाण्याची मोटार, दोन पितळी ताट आणि देवतांची दोन तांब्याची नावे असा एकूण अंदाजे १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या आरोपींकडून यापूर्वीही अशाच स्वरूपाचे गुन्हे झाले आहेत का, याची पडताळणी पोलिसांकडून करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नेवखर सिंह, अपर पोलीस अधीक्षक विक्रम राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे, पोहेकॉ. सचिन चौधरी, सदत राठोड, धनाजी कावळे, शुभम पाईकराव, पोका. मतीन शेख, दिलीप गायकवाड, इरफान खान व भगवान राठोड यांच्या पथकाने केली. मंदिरातील चोरीसारख्या संवेदनशील प्रकरणाचा छडा लावत आरोपींना ताब्यात घेतल्याने पोलिसांच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष वेधले आहे.

**पाऊस कमी पडल्यामुळे** ढेकूण व ऊमणीचा प्रादुर्भाव आणि त्यामुळे होत असलेली उत्पादनातील घट या सर्व बाबींचा शासनाने गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच साखरेच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक बोजा पडत असल्याने साखरेच्या वाढीव दराबाबतही तातडीने निर्णय घेऊन सामान्य जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या प्रकरणात शासन व प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा. शेवटी सोळंके यांनी असे म्हटले आहे.

**ठेकेदार ...**

उगवले जागो जाग
धर्म कांड ठेकेदार
सजली छान दुकाने
सदैव उघडी ती दारं

भोळ्या भाबड्यावर
रे खरी त्यांची मदार
आमचे देता आम्हां
तरीही तुम्हीं उदार

फिरतोयं रानोमाळ
सोडून कसे घरदार
भरभरू मिळे नीत
आश्वासने असरदार

सर्वसामान्य फिरती
का उगाचं दारोदार
लुळी पांगळी फौज
राज्य करी सरदार

धर्माचे नावे फितवा
फतवा काढा हजार
बुडला बुडवला धर्म
गर्जनावल्गनाबेजार

धर्माची पट्टी डोळ्यां
आंधळे करे व्यापार
भोळे भाबडे लुटले
ठेकेदार सुटे अपार

धर्मकर्म करत असा
तपास शास्त्रआधार
गळ्यात पदव्या हार
शिक्षीत वेड्या सुधार

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६.**

**वर्षा सहली ...**

वर्षा सहली मस्त
रंगलेल्या रंगतदार
कधी ती रिमझिम
बरसते संततधार

निसर्ग निर्मित झरे
उत्साह दे धुवांधार
इंद्र धनुष्य मनोहर
मिटे मनीचा अंधार

नेत्रा सुखावेसुशांत
चादरी हिरव्यागार
पोतडी खूप अद्भुत
पर्यावरण जादूगार

फक्त देत राहे दाता
साक्षात किमयागार
विविध रंगाची फुले
रे उधळणबहारदार

निसर्गसाक्षात उभा
उघडून आपले दार
पोतडीतल्या चिजा
वाटत राहे दिलदार

इथे रोखीतमामला
ठेवत नाहीत उधार
गुपीते करतो उघडे
मन मोकळे भरदार

जराजपून सहलीत
सुरक्षेवरी हो मदार
धाडस येई अंगलट
नकोजीवावर उदार

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

**राखी ...**

राख्यांचे बाजरांत
विक्री ती जोरात
बहिणींची गं गर्दी
चालेआनंदभरात

पवित्र रेशीम नातं
विख्यात जगतात
हरिअन् द्रौपदीची
गं महती सांगतात

विविधांगी राख्या
आकर्ष दिसतात
तृप्तबहिणाबाईंचे
चेहरेगोड हसतात

राख्या संपाव्यात
खपू द्या हातोहात
बंधुराजांचे कुणा
नको रिकामे हात

सर्वत्र रे दिसतात
राख्या त्या हातात
अत्याचार सातत्ये
तरीही का होतात

सण ना हो बेगडी
स्नेहहवे प्रत्यक्षात
रोजचं रक्षा बंधन
जिव्हाळा वक्षात

स क्षम हो भगिनी
शान स्वसंरक्षणात
चित्र आता बदला
प्रश्न सुटेलं क्षणात

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

**सहली ...**

नेतेमंडळी आताशा
काढे मोफत सहली
कधी लाडकीबहीण
बोलता कधी सहेली

कसले हे गौडबंगाल
उलघडत नसे पहेली
उदारकर्ण सद्प्रवृत्ती
आधीकधीनपाहिली

खूप काही घ्यायचेयं
हातावर ठेवे अधेली
सेवा खाण्यास मेवा
व्यवहारअसे अर्धेली

सध्या वागा मुलायम
मग करे मस्त दंडेली
गुंडाळूनि ठेवा आत्ता
कुवृत्ती उद्रेकी तंडेली

झोपडपट्टी भेटीगाठी
विचारा बुवा खुशाली
गरिबीझाका हळूवार
पांघरू उबदार शाली

मेण्यामधून फिरताना
अधेमध्ये उतर खाली
दावणीस बांध गुलाम
कार्यकर्तेवाहे पखाली

साधुचापेहराव आवडे
बिनधास्तफिरे मवाली
सबुरीनेघ्यायचे अंमळ
सत्ता आपल्या हवाली

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# योगानंद माध्यमिक विद्यालयातील ९९ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न

## वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मित्रांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

परतूर/प्रतिनिधी : योगानंद माध्यमिक विद्यालय, परतूर येथील इयत्ता दहावीच्या १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल लेमन ट्री येथे आनंदी वातावरणात पार पडला. तब्बल सात तास रंगलेल्या या गेट-टुगेदर मध्ये जुन्या आठवणींना उजाळा देत मित्रांनी मनमोकळ्या गप्पा, हास्यविनोद आणि जीवनातील विविध अनुभवांची देवाणघेवाण केली.

शाळेच्या वर्गखोल्यांपासून सुरू झालेली मैत्रीची सुंदर वाटचाल अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र आली. काळ बदलला, प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या, जीवनाची दिशा बदलली; मात्र बालपणीच्या मैत्रीतील आपलेपणा, जिव्हाळा आणि प्रेम आजही तितकेच कायम असल्याची सुखद अनुभूती या स्नेहमेळाव्यात सर्वांना आली.

यावेळी प्रत्येक मित्राने शाळेनंतरच्या जीवनप्रवासातील विविध अनुभव, आपल्या क्षेत्रातील यश, संघर्ष तसेच आयुष्यातील सुख-दुःखाचे प्रसंग मनमोकळेपणाने एकमेकांसोबत शेअर केले. मित्रांनी एकमेकांच्या यशाचे मनापासून कौतुक व अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी



शुभेच्छा दिल्या. जुन्या आठवणींना उजाळा देताना शाळेतील गंमती-जमती, मित्रांसोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण आणि बालपणीच्या आठवणींनी वातावरण भावूक तसेच आनंदी झाले. सात तासांचा स्नेहमेळावा; आठवणी मात्र आयुष्यभरासाठी! अशी भावना व्यक्त करत मित्रांनी भविष्यातही अशाच प्रकारे नियमितपणे एकत्र येण्याचा संकल्प केला. या स्नेहमेळाव्यामुळे अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा जुन्या मित्रांच्या नात्याला नव्या आठवणींची किनार मिळाली.

या स्नेहमेळाव्यास राहुल लोणीकर यांच्यासह घनश्याम दायमा, अभय काळुंके, अशोक अंभुरे, किशोर कद्रे, अविनाश राठोड, विशाल यंदे, नारायण सेठ गायकवाड, संदीप पाटील, बाळासाहेब कोरडे, दुर्गेश पोद्दार, बापू मिसाळ, दीपक ढोले, सोमनाथ उदेवाल, रोशन बगडिया, विनोद बागल, सचिन तेलगड, अरुण वाघमारे, डॉ. राजेश जावळे, निलेश बगडिया, किरण बल्लमखाणे, संजय व्यवहारे, दिगंबर मुजमुले, अरुण काळे, राज कांगणे, मुकुंद शेपाळ, संतोष टेकाळे, अनिल टेकाळे, किरण चेपटे, संतोष वाघमारे यांच्यासह इतर मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पंकजा मुंडेंच्या मध्यस्थीनंतर जालन्यातील बंजारा समाजाचे आमरण उपोषण मागे; मुख्यमंत्र्यांसोबत भेटीचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी : बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती (ड्ढ) प्रवर्गात समावेश करून सर्व शासकीय सवलती लागू कराव्यात,या प्रमुख मागणीसाठी जालन्यामध्ये २१ ऑगस्टपासून आमरण उपोषणाला बसलेले एकनाथ चव्हाण यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मध्यस्थीनंतर अखेर आपले उपोषण मागे घेतले होते. पर्यटन व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या मध्यस्थीनंतर आणि अस्वास्थ्यामुळे त्यांनी हे उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पंकजा मुंडे यांनी उपोषणकर्त्यांशी दूरध्वनीवरून थेट संपर्क साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.एकनाथ चव्हाण यांची प्रकृती खालावत




असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी उपोषण सोडण्याची विनंती केली.तसेच बंजारा समाजाच्या आरक्षणासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या सद्यस्थितीची माहिती देण्यासाठी आणि शिष्टमंडळाची भेट घडवून आणण्यासाठी पुढील आठवड्यात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन बैठक आयोजित करण्याचे आश्वासन पंकजा मुंडे यांनी दिले.याबाबत पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून बंजारा समाजाच्या सर्व काही मागण्यांची तात्काळ दखल घेण्याची विनंती यावेळी पत्राद्वारे केली आहे.या आश्वासनानंतर एकनाथ चव्हाण आणि त्यांच्या सर्व बंजारा समाज बांधवांनी व सहकाऱ्यांनी उपोषण स्थगित केले होते. आज मुंबई येथे पंकजाताई मुंडे व एकनाथ चव्हाण यांनी एसटी आरक्षण संदर्भात सविस्तर चर्चा केली असून,यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून योग्य तो निर्णय घेण्याचे व केंद्र सरकारला शिफारस करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सातवी राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी जालन्याचा संघ संगमनेरला रवाना



संगमनेर : महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने ध्रुव ग्लोबल स्कूल, संगमनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या सातव्या राज्यस्तरीय योगासन चॅम्पियनशिपसाठी जालना जिल्ह्याचा संघ रवाना झाला आहे. ही चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धा २६ ते २९ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत जालना जिल्ह्यातील खेळाडू उत्साहाने सहभागी होणार आहेत. जालना संघासोबत मुख्य प्रशिक्षक कोच वैभव आर्य, भावना आर्य आणि वैष्णवी आर्य उपस्थित आहेत. स्पर्धेत जालना जिल्ह्याचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उंचावतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# माणगावमध्ये ३० ऑगस्टला राज्य स्तरीय बुरुड समाजाचा महामेळावा

## मंत्री, आमदार, माजी खासदारांसह समाजातील मान्यवरांची उपस्थिती; गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववानांचा होणार विशेष सन्मान

विश्वास गायकवाड, बोरघर, माणगाव, रायगड : महाराष्ट्रातील बुरुड समाजाला एका व्यासपीठावर एकत्र आणत सामाजिक एकजूट, शैक्षणिक प्रगती आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देण्यासाठी अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भव्य राज्यस्तरीय बुरुड समाज महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा महामेळावा रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता माणगाव तालुक्यातील तिलोरे येथे आयोजित करण्यात आला आहे. मानस बँक्वेट हॉल, इंडियन ऑईल पेट्रोल पंपाशेजारी, मुंबई-गोवा महामार्गालगत, तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड येथे हा राज्यस्तरीय सोहळा होणार असून महाराष्ट्राच्या विविध भागांतून बुरुड समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. मंत्री, आमदार आणि मान्यवरांची उपस्थिती या महामेळाव्याला महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यामध्ये रायगडचे पालकमंत्री मा. श्री. भरतशेठ गोगावले, माजी खासदार व माजी मंत्री मा. श्री. चंद्रकांतजी खैरे, महिला व बालविकास मंत्री मा. कु. आदितीताई तटकरे, चंद्रपूरचे आमदार तथा समाजभूषण मा. श्री. किशोरभाऊ जोरगेवार आणि अकोल्याचे आमदार मा. श्री. हरीशभाऊ पिंपळे यांचा समावेश आहे. याशिवाय महाराष्ट्रभरातील बुरुड समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. गुणवंत विद्यार्थी आणि कर्तृत्ववानांचा गौरव महामेळाव्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे समाजातील कर्तृत्ववान व्यक्ती आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान सोहळा. समाजाच्या विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या व्यक्तींना या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यामध्ये नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, सरपंच यांसारख्या लोकप्रतिनिधींचा, तसेच डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि इतर उच्चशिक्षित मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर समाजातील ज्येष्ठ नागरिकांचाही विशेष सन्मान केला जाणार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमात प्रोत्साहन देण्यात येणार असून इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते नववी तसेच दहावी आणि बारावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. सामाजिक एकजुटीचा संदेश महाराष्ट्रातील बुरुड समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी समाजबांधवांनी एकत्र येणे गरजेचे आहे. या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा राज्यस्तरीय महामेळावा समाजातील विविध घटकांना परस्परांशी जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. समाजातील गुणवंतांचा गौरव **(पान ३ वर)**




# स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरांची मालिका

## परतूर-मंठा मतदारसंघातील विविध गावांत आयोजन; नेत्र तपासणी, चष्मे व औषधांचा लाभ

परतूर । प्रतिनिधी : शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघात मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिरांची मालिका आयोजित करण्यात आली असल्याचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी सांगितले लोककल्याण आरोग्य केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या उपक्रमातून ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शिबिरामध्ये नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी तसेच आवश्यक औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. नेत्र परीक्षणानंतर चष्म्याची आवश्यकता असलेल्या नागरिकांना नाममात्र २०० रुपयांमध्ये चष्मा तयार करून दिला जाणार आहे. सर्दी, खोकला, सांधेदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, पोटदुखी, आम्लपित्त, डोकेदुखी, ताप, थंडी आदी आजारांसाठी औषधे उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे परतुर शिवसेना तालुकाप्रमुख भारत पंडित मंठा शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यानी सांगितले आहे.

**२९ ऑगस्टपासून शिबिरांना प्रारंभ**

या आरोग्य अभियानाला २९ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारंभ होणार आहे. पहिल्या दिवशी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत वाटूर येथे, तर दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत आंबा येथे शिबिर होणार आहे. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते दुपारी १ या वेळेत सातोना, तर दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत आंगलगाव येथे शिबिर होईल. ३१ ऑगस्ट रोजी कन्हाळा, तर १ सप्टेंबर रोजी परतूर येथे नागरिकांची आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर २ सप्टेंबर



रोजी वलखेड, ३ सप्टेंबर रोजी खांडवी व आनंदवाडी, ४ सप्टेंबर रोजी तळणी, ५ सप्टेंबर रोजी सेलगाव, ६ सप्टेंबर रोजी नारायणगाव व देवगाव खवणे, तर ७ सप्टेंबर रोजी केंधळी व विडोळी येथे शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. **ग्रामीण नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन** ग्रामीण भागातील नागरिकांना विविध **(पान ३ वर)**

# राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीतर्फे रक्षाबंधन उपक्रमाचा शुभारंभ

जालना : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार व महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा वैशालीताई नागवडे यांच्या सूचनेनुसार जालना येथे शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार असून या कार्यक्रमास जास्तीत जास्त पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आव्हान शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात सकाळी १०.१० वाजता जिल्हाध्यक्ष अरविंदरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस **(पान ३ वर)**

कार्यालय, नगर परिषद परतूर
जा.क्र./ ११४१/२०२६
दिनांक: २७/०८/२०२६

## शुध्दीपत्रक

निविदा सूचना क्र. १२ (सन २०२६-२७)

**न.प. परतूर कार्यालयाव्दारे पत्र क्र. १०९९/२०२६ दि. १९/०८/२०२६ रोजी दै. चकमक या अंकास सदर निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आलेली असून तांत्रिक कारणास्तव खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येते.**

१. कोरे निविदा दरत्रक रोख किंमतीने नगर परिषद कार्यालयात दि. २७/०८/२०२६ ते दि. ०३/०९/२०२६ पर्यंत मिळतील. (सुट्टीचे दिवस वगळून)

२. लिफाफा बंद निविदा (दरपत्रक) मुख्याधिकारी यांचे कार्यालयात दि. ०४/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत स्विकारले जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा दरपत्रक उघडल्या जातील.

३. इतर निविदेच्या अटी व शर्ती दि. १९/०८/२०२६ रोजीच्या प्रसिध्द निविदा सूचनेनुसार कायम राहतील. करिता नोंद घ्यावी.

**स्वा./-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, परतूर**